तरुण भारत




कोल्हापूर : धम्मविचार संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी संविधानाचे प्रास्ताविकेचे वाचन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. सतीशकुमार पाटील, डॉ. सुरेश शेळके, सुशिला यादव, विजया कांबळे आदी.

# बुद्धविचारच जगाला तारेल : कुलगुरू

## शाहू स्मारक येथे धम्मविचार साहित्य, संस्कृती संमेलन उत्साहात

प्रतिनिधी

कोल्हापूर

धकाधकीच्या जीवनात बुद्धांचा धम्मविचारच जगाला तारेला, समतावादी समाज निर्माण करण्यासाठी बुद्धांचे विचार अंगिकारावेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजित चौथ्या धम्मविचार साहित्य, संस्कृती संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. शाहू स्मारक भवनमध्ये झालेल्या या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सतीशकुमार पाटील होते. याप्रसंगी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन केले. ज्येष्ठ अभ्यासिका विजया कांबळे यांच्या हस्ते ज्येष्ठ कार्यकर्त्या सुशीला यादव यांना 'धम्मदीप जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानीत केले.

कवी संमेलन कवी वसंत भागवत यांच्या अध्यक्षतेखाली झाले. कवी रंजना सानप, प्रकाश शिंदे, आराधना गुरव आदींनी कविता सादर केल्या. 'कोरोनानंतरचे जग आणि धम्म चळवळ' यावर परिसंवाद झाला. यामध्ये डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. सोमनाथ कदम, डॉ. कपिल राजहंस, संतोष गमरे आदींनी सहभाग नोंदवला. सायंकाळी 'निळ्या पाखरांची माय' हा बिश्वनाथ कांबळे निर्मित प्रबोधनात्मक भिम बुद्ध गीतांचा कार्यक्रम झाला.

काही सत्रांचे संमेलनाध्यक्ष चंद्रकांत सावंत तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सुरेश शेळके, ॲड. करूणा मिणचेकर उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. स्वप्निल बुचडे यांनी केले तर आभार प्रा. शोभा चाळके यांनी मानले. यावेळी अनिल म्हमाने, दयानंद ठाणेकर, सुरेश केसरकर, अमित मेधावी, विमल पोखर्णीकर, ॲड. अधिक चाळके, शक्ती कश्यप, सिद्धार्थ कांबळे, चंद्रनील सावंत उपस्थित होते.

31 JAN 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजात बुद्धीप्रामाण्यवादी व्यवस्था निर्माण होण्याची गरज

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; चौथे धम्मविचार साहित्य-संस्कृती संमेलन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

धम्म विचार घेऊन आयोजित करण्यात आलेले हे साहित्य संमेलन इतर साहित्य संमेलनांपेक्षा वेगळे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जसे 'बुद्धांकडे चला', अशी हाक दिली होती, त्यानुसार भगवान गौतम बुद्धांच्या आचार, विचार घेऊन हे साहित्य संमेलन भरविले जात आहे. हे खरोखर कौतुकास्पद असून यातून समाजातील विषमता नष्ट होऊन बुद्धी प्रामाण्यवादी व्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या धम्म विचार व संस्कृती संमेलनाच्या उद्घाटन समारंभात कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. अध्यक्षस्थानी साहित्यिक डॉ. सतीशकुमार पाटील होते. शाहू स्मारक भवनमध्ये या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कॉ. सुशीलाताई यादव यांना धम्मदीप जीवन गौरव पुरस्कार कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत धम्म चळवळीच्या ज्येष्ठ अभ्यासिका विजया कांबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अनेक विचारवंत लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचेही प्रकाशनही डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिर्के म्हणाले, आपल्याकडे सम्यक दृष्टी, सम्यक विचार, सम्यक वाणी असली पाहिजे, हे बुद्धांनी आपल्याला शिकवले आहे. अशा साहित्य संमेलनातून सम्यक विचारांची मांडणी होणार असून हे विचार पुढे देशाची, राष्ट्राची प्रगती साधण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतील.

चंद्रकांत सावंत यांनी स्वागत केले. या संमेलनाच्या निमंत्रक ॲड. करुणा मिणचेकर म्हणाल्या, जनतेला समानतेच्या धाग्यावर बांधणारा विचार म्हणजे धम्माचा विचार होय. मानवेतृचा प्रवाह गतिमान करण्यासाठी धम्माच्या विचारांचे आचरण करणे गरजेचे आहे. तिसऱ्या सत्रात कवींनी आपल्या कविता सादर केल्या. चौथ्या सत्रात जग आणि धम्म चळवळ या विषयावर परिसंवाद झाला. यात अनेक विचारवंतांनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 JAN 2022
तरुण भारत

# महाविद्यालये, अधिविभाग उद्यापासून सुरू

## नियमांचे पालन करण्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये १ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश द्यावयाचा आहे. त्यामुळे उद्यापासून पुन्हा विद्यापीठ व महाविद्यालयांचा कॅम्पस फुलणार आहे. प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्थामधील नियमित वर्ग सुरू करावे. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबत विद्यापीठ प्रशासनाने २८ जानेवारी रोजी परिपत्रक काढले आहे. त्यानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७६ महाविद्यालये सुरू होणार आहेत. यात



२ लाख ६० हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दोन्ही डोस न घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून द्यावी. नियमित वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्यासाठी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांची संमती घ्यावी. विद्यापीठ, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठाने निर्णय घ्यावा. याची माहिती प्राचार्य, अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुखांना द्यावी. कोरोनाचा स्थानिक पातळीवरील निर्णय घेवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपस्थितीबाबत निर्णय घ्यावा. त्याचा अहवाल विद्यापीठास द्यावा, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने दिल्या.

### वसतिगृह टप्प्याटप्प्याने सुरू करणार

महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभागातील वर्ग शासन निर्देश व कोरोना नियमांचे पालन करून १ फेब्रुवारीपासून सुरू केली जाणार आहेत. विद्यापीठात विद्यार्थी-विद्यार्थिनींची दहा वसतिगृह आहेत. त्यामधील मुलींचे वसतिगृह वगळता सर्व वसतिगृह जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. वसतिगृहांचा ताबा मिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनाशी विद्यापीठाने पत्रव्यवहार केला आहे. उच्च शिक्षण विभागाच्या आदेशानुसार टप्प्या-टप्प्याने वसतीगृह सुरू केली जातील.

– डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# महाविद्यालये उद्यापासून सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांनुसार शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, शिक्षण संस्थांमधील लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे नियमित वर्ग १ फेब्रुवारीपासून प्रत्यक्षरीत्या ऑफलाईन पद्धतीने सुरू होणार आहेत. त्यामुळे पुन्हा महाविद्यालय कॅम्पस विद्यार्थ्यांनी गजबजून जाणार आहे.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्थांमधील नियमित वर्ग सुरू करणे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबत प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी २८ जानेवारी रोजी परिपत्रक काढले आहे. पान ४ वर

# महाविद्यालये उद्यापासून सुरू

(पान १ वरून) त्यानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७६ महाविद्यालये सुरू होणार आहेत. यात २ लाख ६० हजार विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दोन्ही डोस न घेतलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. नियमित वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्यासाठी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांची संमती घ्यावी.

विद्यापीठ, महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा. याची प्राचार्य, अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुखांना माहिती द्यावी. कोरोनाचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव लक्षात घेऊन महाविद्यालय, अधिविभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती १०० टक्के ठेवायची किंवा ती कमी करायची याचा निर्णय स्थानिक स्तरावर घ्यावा. त्याचा अहवाल महाविद्यालयांनी विद्यापीठातील संलग्नता विभागास व विद्यापीठातील अधिविभाग व प्रशासकीय विभागांनी आस्थापना विभागास द्यावा, अशा सूचना कुलसचिवांनी दिल्या आहेत.

> विद्यापीठात विद्यार्थी-विद्यार्थिनींची दहा वसतिगृहे आहेत. त्यामधील मुलींचे वसतिगृह वगळता सर्व वसतिगृहे जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. वसतिगृहांचा ताबा मिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनाशी विद्यापीठाने पत्रव्यवहार केला आहे. उच्च शिक्षण विभागाच्या आदेशानुसार टप्प्याटप्प्याने वसतिगृहे सुरू केली जातील.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

पुढारी

# मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करा : कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** प्रत्येक प्रौढ विद्यार्थी-विद्यार्थिनीने मतदार यादीत नाव नोंदविले पाहिजे. त्याचप्रमाणे समवयस्कांना त्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आझादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत आज १२व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त 'सर्वसमावेशक, सुलभ व सहभागपूर्ण निवडणूका' हा उपक्रम झाला. याप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, केवळ मतदार यादी नाव नोंदविण्याने काम करुन चालणार नाही. निवडणुकांमध्ये मतदान करण्यासही युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. लोकशाहीचे पवित्र कर्तव्य म्हणून देशाचा विकास, लोकशाहीचे संवर्धन यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करायला हवे. नोडल अधिकारी डॉ. प्रल्हाद माने यांनी उपस्थितांना मतदार दिवस प्रतिज्ञा दिली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

लोकमत

# आशियाई देशात सौंदर्य अन् सौहार्द जपायला हवे

## रोमिला थापर : आंतरराष्ट्रीय परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : दक्षिण आशियाई क्षेत्रातील देशांचे बहुविविधतेमधील सुंदरता हे वैशिष्ट्य ऐतिहासिक कालखंडापासून परंपरेने विकसित होत गेलेले आहे. हे सौंदर्य व सौहार्द जपण्याची जबाबदारी आधुनिक काळातील धोरणकर्त्यांनी स्वीकारायला हवी, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ प्रा. रोमिला थापर यांनी आज येथे केले.



शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग आणि द इंटरनॅशनल सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज (मॉस्को, रशिया) यांच्यावतीने आयोजित केलेल्या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' या शृंखलेतील 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव - २०२२ ' हा परिसंवादाचा विषय होता. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. थापर म्हणाल्या, बहुसांस्कृतिकता, बहुविविधता हे दक्षिण आशियाचे वैशिष्ट्य राहिले आहे. भारताने या क्षेत्राचे इतिहास काळापासून नेतृत्व केले आहे. इतिहासात या परिक्षेत्रात जसा संघर्ष झडला, तसाच सह-अधिवासही निर्माण झाला. येथे प्रत्येक बाबतीत सहिष्णुता होती, असे नव्हते; तसेच, प्रत्येकवेळी, प्रत्येक बाबतीत हिंसेचा मार्ग अवलंबला गेला, असेही घडले नाही. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय आदान-प्रदानातून येथील इतिहास, भूगोल घडला आणि आकाराला आला. एकूणच सौहार्द व सहचर्याने राहण्याचा इतिहास या विभागाला आहे.

ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी म्हणाले, दक्षिण आशियामध्ये जगाच्या एकूण ८०० कोटी लोकसंख्येपैकी साधारण ११९ कोटी लोक राहतात. याचा अर्थ जगाच्या अवघ्या साडेतीन टक्के इतक्या अल्प भूभागावर जगाची २५ टक्के लोकसंख्या राहते आहे. या लोकसंख्येचा येथील अधिवासाचा इतिहास सुमारे १२ हजार वर्षांपासूनचा आहे, मात्र, अमेरिकन, पाश्चिमात्य युरोपियन अशांसारखी दक्षिण आशियाई अशी त्यांची स्वतंत्र जागतिक ओळख निर्माण झाली नाही. जगात सात हजार भाषा असून, त्यातील २५ टक्के येत्या ३० वर्षांत अस्तंगत होतील. दक्षिण आशियाई देशांनी मात्र भाषा जगविण्याची कामगिरी केली आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे रशियन विद्यापीठांशी गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ शैक्षणिक, संशोधकीय व सांस्कृतिक सौहार्दाचे संबंध आहेत. स्वागत विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले तर इंदिरा गजीयेवा (रशिया) यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अरुंधती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

या परिसंवादाला मॉस्को येथील रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर ह्युमॅनिटीजच्या इंटरनॅशनल अफेअर्सच्या प्र-कुलगुरू प्रा. वेरा जबोत्किना, रशियन हाऊस इन मुंबईच्या संचालिका डॉ. इलेना रेमीजवा, प्रा. अलेक्झांद्र स्तल्यारव यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी भारतातील राजदूत निकोलाय कुदाशेव, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद नावरे आदी उपस्थित होते.

31 JAN 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दक्षिण आशियाई देशांतील बहुसंख्याकवाद धोक्याचा

## जतिन देसाई : विदेशी भाषा विभागाचा आंतरराष्ट्रीय परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बहुसांस्कृतिकतेचा प्रश्न हा सर्व दक्षिण आशियाई देशांचा प्रश्न आहे. महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्याची चर्चा करणे महत्त्वाचे आहे. गांधीजींना बहुसांस्कृतिकता, लोकशाही मान्य होती; पण हिंदुत्ववाद्यांना केवळ बहुसंख्य लोकांची हुकूमशाही हवी असते. हा बहुसंख्याकवाद धोक्याचा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार जतिन देसाई यांनी रविवारी केले.





### तृतीयपंथीय समुदायाला मानवी अधिकार मिळावेत

- 'दक्षिण आशियातील लिंगभाव' या सत्रात सांगलीच्या संपदा ग्रामीण महिला संस्थेच्या सचिव मीना शेषू आणि पाकिस्तानच्या डॉ. अझरा सईद यांनी विचार मांडले.
- या सत्राच्या अध्यक्ष प्रा. उमा चक्रवर्ती होत्या. तृतीयपंथीय समुदायाला गुन्हेगार ठरवणारे कायदे रद्द करा. त्यांना मानवी अधिकार मिळाले पाहिजेत, अशी ठाम भूमिका शेषू यांनी मांडली.
- दरम्यान, या सत्रात दक्षिण आशियातील स्त्रिया पितृसत्ताकता, सरंजामी मूल्यव्यवस्था व साम्राज्यवाद यांच्या तिहेरी शोषणाच्या बळी आहेत. कृषी क्षेत्रातील स्त्रिया अत्यंत हलाखीत आहेत, असे विश्लेषण करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग आणि द इंटरनॅशनल सेंटर फॉर साउथ एशियन स्टडीज, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज, मॉस्को यांच्या संयुक्त विद्यमाने 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' अंतर्गत 'दक्षिण आशिया : समकालीन गतिमान वास्तव' या विषयावरील आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाइन परिसंवाद सुरू आहे. त्याच्या दुसऱ्या दिवशी 'दक्षिण आशिया : वांशिक बहुलवाद, सांस्कृतिक विविधता आणि बहुसांस्कृतिकतेसमोरील आव्हाने' या सत्रात जतीन देसाई, डॉ. अविनाश पांडे, परिमल माया सुधाकर यांनी मांडणी केली. भारताकडे निर्वासितांबद्दलची भूमिका आणि कायदा नाही. सत्ताधारी मनमानी पद्धतीने निर्णय घेतात. भारताची घटना स्वातंत्र्य चळवळीतून आकाराला आली; पण तिला डावलून बहुसंख्याकवाद लागू करायची योजना आहे. सार्क परिषदेची बैठक २०१४ नंतर झालेली नाही. अशा विषयांवर परिषदेतच निर्णय होऊ शकतात, असे देसाई यांनी सांगितले. दरम्यान, 'दक्षिण आशियातील साहित्यिक अनुवादाची भूमिका' या सत्रात डॉ. सईदा हमीद, डॉ. सचिन केतकर, फर्वा शफकत (पाकिस्तान) यांची व्याख्याने झाली. फर्वा शफकत यांनी व्ही. शांताराम यांच्या आत्मचरित्राचा उर्दू भाषेत अनुवाद केला आहे. साहित्यिक अनुवाद ही दक्षिण आशियातील सर्वसामान्य लोकांच्या हृदयाला जोडणारा सांस्कृतिक दुवा बनू शकतो, असे मत त्यामध्ये व्यक्त झाले.

सकाळ



कोल्हापूर : 'जिभाळी' काव्यसंग्रहाच्या प्रकाशनावेळी डावीकडून कवी अमितकुमार पवार, प्रा. शिवाजी जाधव, प्रा. रणधीर शिंदे, प्रा. निशा मुडे-पवार, रंजना पवार, बाळासाहेब पवार.

# 'जिभाळी' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** माणदेशासारख्या वैराण प्रदेशातून येत, शिवाजी विद्यापीठात बळ घेऊन आपल्या असतेपणाच्या खुणा, जाणिवा 'जिभाळी' या काव्यसंग्रहातून कवीने व्यक्त केल्या आहेत. ग्रामीण भागातील तरुणांच्या वेदनांचे, भावनांचे आंतरिकीकरण कवीने या काव्यसंग्रहातून मांडले असल्याचे मत मराठी साहित्याचे समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागाचा विद्यार्थी अमितकुमार पवार यांच्या 'जिभाळी' या कविता संग्रहाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. बागल चौकातील सदिच्छा हॉलमध्ये कार्यक्रम झाला. कवी अमितकुमार यांनी विद्यापीठातील होस्टेलच्या वास्तव्यात या कवितांना मूर्तरूप दिल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. निशा मुडे-पवार होत्या. प्रा. डॉ. शिवाजी जाधव, बाळासाहेब पवार उपस्थित होते.

3 1 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुसंख्याकवाद प्रश्न धोक्याचा

## जतीन देसाई ; विद्यापीठात आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिसंवाद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : बहुसांस्कृतिकतेचा प्रश्न सर्व दक्षिण आशियाई देशांचा आहे, हिंदुत्ववाद्यांना केवळ बहुसंख्य लोकांची हुकूमशाही हवी असून बहुसंख्याकवाद धोक्याचा आहे, असे मत जतीन देसाई यांनी आज व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा विदेशी भाषा विभाग, मराठी अधिविभाग व रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज (मॉस्को, रशिया) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'दक्षिण आशिया : 'अज्ञात' अवकाशांचा शोध' अंतर्गत 'दक्षिण आशिया: समकालीन गतिमान वास्तव - २०२२' विषयावरील आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय ऑनलाईन परिसंवादात ते बोलत होते.



दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात 'दक्षिण आशिया : वांशिक बहुलवाद, सांस्कृतिक विविधता आणि बहुसांस्कृतिकते समोरील आव्हाने' विषयावर त्यांनी संवाद साधला. श्री. देसाई म्हणाले, "आजच्या महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्याची चर्चा करणे महत्त्वाचे आहे. गांधी स्वतः एक सनातन हिंदू होते. पण, पद्धतशीरपणे कट रचून त्यांना ठार करण्याच्या आठ प्रयत्नानंतर ३० जानेवारीला त्यांना ठार मारले. गांधीजींना बहुसांस्कृतिकता, लोकशाही मान्य होती. पाकिस्तानात पंजाब्यांचा बहुसंख्यांकवाद सिंध चळवळीला दडपतो. तिथेही अनेकांवर देशद्रोहाचे खटले केले जातात. पख्तुनांवर दडपशाही करण्यात येते. बलुची राष्ट्रवाद देखील काश्मीरप्रमाणे तिथे ज्वलंत प्रश्न बनला आहे."

ते म्हणाले, "२००९ मध्ये एलटीटीईची चळवळ श्रीलंकेमध्ये मोडून काढली. आता तिथल्या तमिळ जनतेकडे कुणी लक्ष देत नाही. रोहिंग्या लोकांवर ब्रह्मदेशात दडपशाही सुरू आहे. तीन लाख रोहिंग्यांना बांगलादेशात पळून जावे लागले. त्यांना सहानुभूती दाखवण्याऐवजी भारत कठोर भूमिका घेत आहे. अफगाणिस्तानातून येणाऱ्या हिंदू आणि शीख यांना फक्त निवारा मिळेल, असे जाहीर केले आहे. डॉ. अविनाश पांडे व डॉ. परिमल माया सुधाकर यांनी या विषयावर मांडणी केली."

'दक्षिण आशियातील साहित्यिक अनुवादाची भूमिका' सत्रात डॉ. सईदा हमीद, डॉ. सचिन केतकर, फर्वा शफकत (पाकिस्तान) यांनी मार्गदर्शन केले. 'दक्षिण आशियातील लिंगभाव' सत्रात डॉ. मीना शेषू, डॉ. अझरा सईद (पाकिस्तान) यांनी विचार मांडले. या सत्राच्या अध्यक्ष प्रा. उमा चक्रवर्ती होत्या.

### अफगाणिस्तानवर भुकेने मरण्याची वेळ

श्री देसाई म्हणाले, "अफगाणिस्तानातील ताजिक लोकांना ताजिकिस्तानात आसरा घ्यावा लागतो. भारत पूर्वी ताजिकींना पाठिंबा देत असे. हल्ली ते थांबवले आहे. अफगाणिस्तानवर भुकेने मरण्याची वेळ आली आहे. भारत मदत पाठवायला तयार आहे, मात्र पाकिस्तानातून कोणत्या मार्गाने, ती जावी याबद्दल निर्णय होत नाही."